## जगभर

# उपेक्षितांसाठी आंतरराष्ट्रीय फुटबॉल महोत्सव

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

लेख लिहिण्याच्या वेळी (जून मध्य) फ्रान्समध्ये युरोपिअन फुटबॉल स्पर्धा चालू आहेत. या स्पर्धा दर चार वर्षांनी होतात व अत्यंत चुरशीने खेळल्या जातात. त्या या वर्षी १० जून ते १० जुलैपर्यंत चालतील. नंतर १ ऑगस्टपासून ब्राझीलमध्ये ऑलिम्पिक सुरु होईल. त्यात जगभराचे देश भाग घेतील. फुटबॉलचा वर्ल्ड कपही दर चार वर्षांनी असतो. तो तर ऑलिम्पिकपेक्षा अधिक लोकप्रिय आहे. जगातील एक दशांशाहून जास्त लोकांनी मागच्या स्पर्धेतील अंतिम सामना पाहिला.

या सर्व स्पर्धा जे देश अधिकृत आहेत, म्हणजे ज्या देशांना जागतिक मान्यता आहे, अशांसाठीच आहेत. पण जगात असे अनेक समूह आहेत, जे या अधिकृत देशांचा भौगोलिक भाग मात्र आहेत. त्यांना मुख्य प्रवाहाचे वर्चस्व मान्य नाही. त्यांना प्रत्येक वेळी देशापासून औपचारिकपणे विभक्त व्हायचेच असेल असेही नाही. पण त्यांना त्यांच्या ऐतिहासिक परंपरांचा सन्मान व्हावा असे वाटते. आपले सांस्कृतिक वैशिष्ट्य मुख्य प्रवाह नाकारतो अशी त्यांची भावना असते.

लेखातील काही उल्लेखांनी हा मुद्दा स्पष्ट व्हावा.

यापूर्वीच्या अनेक लेखांमध्ये मध्यपूर्वेतील कुर्द या स्वत:चा देश नसलेल्या समूहाचा उल्लेख केला आहे. कुर्द लोकांना वसाहतवादानंतर स्वत:चे राष्ट्र मिळेल असे आश्वासन देण्यात आले होते, ते पाळले गेले नाही. त्यामुळे इराण, इराक, तुर्कस्तान व सिरीया या चार देशांत ते विखुरलेले राहिले व प्रत्येक देशात अल्पसंख्यांक झाले. त्यांची स्वायत्ततेची मागणी चारही राजवटींना अमान्य आहे व त्यांच्याकडे देशद्रोही म्हणून पाहिले जाते. त्यांची एकूण लोकसंख्या सुमारे साडे-तीन कोटी असावी.

त्यांना त्यांचा स्वत:चा कुर्दिस्तान हवा आहे. कोठेही प्रतिनिधित्व नसणे ही वस्तुस्थिती हिंसाचाराला खतपाणी घालू शकते, हे यांच्याबाबत तुर्कस्तानमध्ये दिसत आहे.

कुर्द निदान जगाला माहिती असलेले लोक आहेत. पण त्यांच्या इतकी लोकसंख्या नसलेले व प्रत्येक देशात अल्पसंख्यांक असणारे अनेक समूह जगात आहेत. त्यांची नावे काय, ते भौगोलिकदृष्ट्या कोठे आहेत, कोणत्या अधिकृत देशात आहेत, त्यांचा स्वत:चा इतिहास, त्यांच्या भाषा हे बहुधा प्रकाशात येत नाही. काहींच्या भाषाही अक्षरश: दिवसागणिक (वृद्धांच्या मृत्यूने) लुप्त होत आहेत. असे समूह प्रत्येक खंडात आहेत.

त्यांच्या राजकीय व सांस्कृतिक मागण्या, त्या न्याय्य आहेत का नाहीत हे पहाणे हा या लेखाचा उद्देश नाही. जागतिक स्तरावर त्यांची दखल मुख्य प्रवाहाबाहेर क्रीडाक्षेत्रात घेतली जात आहे, याची ही नोंद आहे.

जगभरच्या स्वायत्त फुटबॉल संघटनांना प्रोत्साहन देणारी एक संस्था आहे. तिच्या इंग्रजी आद्याक्षरांनुसार तिचे नाव CONIFA. वर वर्ल्डकपचा उल्लेख केला. ती स्पर्धा FIFA नावाची संस्था १९३२ पासून आयोजित करत आलेली आहे. जगातील आपल्याला माहिती असणारे सगळेच देश FIFA चे सभासद आहत. ही स्पर्धा कोणत्या देशात भरवायची, क्रीडा-संकुले उभारण्याची कंत्राटे कोणाला द्यायची, जाहिरातींचे हक्क कोणाला द्यायचे यासाठी जागतिक निविदा काढल्या जातात. त्यात FIFA चे पदाधिकारी अतोनात भ्रष्टाचार करतात. अगदी जूनच्या पहिल्या आठवड्यातच आजवरचा अध्यक्ष व इतर दोन वरिष्ठ अधिकारी यांनी काहीशे कोटींची लाच खाल्ल्याचे उघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर CONIFA चा उद्देश स्वच्छ कारभार करणे, खेळाचे आयोजन पारदर्शी करणे व उपेक्षित समूहांना वाव देणे हा आहे. CONIFA ची स्थापना ना-नफा तत्त्वावर २०१३ साली स्वीडन देशात झाली. जे समूह FIFA मध्ये नाहीत पण फुटबॉल खेळू इच्छितात, त्यांच्यासाठी ही संघटना आहे. प्रामुख्याने जगात जे समूह उपेक्षित आहेत, त्यांना स्पर्धांतून संधी देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांची अस्मिता जपणे व त्याचवेळी जगातील संघर्ष कमी करणे; भौगोलिकदृष्ट्या दुर्गम प्रदेशात रहाणारे लोक ज्यांना त्यांच्या देशातही स्पर्धांची संधी मिळत नाही, त्यांना फुटबॉलच्या निमित्ताने अशी संधी देणे - ही उद्दिष्टे संस्थेच्या घटनेत नमूद आहेत.

आंतरराष्ट्रीय फुटबॉल संघटनेच्या निर्देशानुसार सभासद वागतील; वर्ण, भाषा, वगैरे कारणांनी खेळाडूत भेद-भाव होणार नाहीत, इत्यादी धोरणे आहेत.

२०१३ च्या स्थापनेनंतर हा पहिला 'विश्व' कप २०१४ ला झाला. त्यानंतरचा आता झाला (मे चा शेवटचा व जूनचा पहिला आठवडा या दरम्यान). यात १२ समूहांच्या संघांनी भाग घेतला. ही स्पर्धा अबखाझिया येथे झाली. अबखाझिया रशियाजवळ काळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर, जॉर्जिया नावाच्या देशाला लागून आहे. जॉर्जिया हा देश आधीच्या सोविएत युनिअनचा भाग होता.

सोविएत युनिअनच्या विघटनानंतर तो स्वतंत्र देश झाला (१९९१). १९९२-९३ ला अबखाझ आणि जॉर्जियन लोक यांच्यात बेबनाव सुरु झाला. अबखाझ लोकांना जॉर्जियाच्या वर्चस्वाखाली राहायचे नव्हते. मग युद्ध झाले आणि त्यात जॉर्जियाचा पराभव झाला. तेव्हापासून अबखाझिया स्वत:ला स्वतंत्र देश मानतो तर जॉर्जिया त्याला आपल्या अखत्यारीतील स्वायत्त प्रदेश मानतो. आजवर अबखाझिया हा स्वतंत्र देश आहे हे जगातील अगदी थोड्या देशांनी मान्य केले आहे. रशियाने २००८ साली अबखाझियाला मान्यता दिली, ताबडतोब जॉर्जियाच्या संसदेने हा आमचाच प्रांत आहे, पण रशियाने तो बळकावलेला आहे - असा ठराव पारित केला! रशियाखेरीज फक्त वेनेझुअला व निकारागुवा या दक्षिण अमेरिका खंडातील देशांनी अबखाझियाचे देश म्हणून अस्तित्व मान्य केले आहे. औपचारिकरीत्या देश नसलेल्या पण स्वत:ला देश मानणाऱ्या काही देशांनीही अबखाझियाला देश अशी मान्यता दिली आहे. तिला जागतिक पटलावर काहीही अधिकृत किंमत नाही. संयुक्त राष्ट्रसंघही त्याला ‘देश’ मानत नाही.

अबखाझियाचे उदाहरण सविस्तर देण्याचे कारण म्हणजे, या स्पर्धेत भाग घेणारे इतर ‘देश’ही निरनिराळ्या परिस्थितीने याच अवस्थेत आहेत. त्यांची अस्मितेची ऊर्मी आणि त्या उर्मीला जागतिक परिमाण लाभावे ही आकांक्षा निदान फुटबॉलच्या योगाने CONIFA अल्पांशाने तरी पुरवताना दिसते.

आजमितीला CONIFA चे तीसहून जास्त सभासद आहेत. युरोपमधले २० प्रांत स्वत:ला निराळे देश मानतात; आशियातील नऊ, आफ्रिकेतील चार तर अमेरिका-कॅनडातील दोन. प्रत्येकाच्या इतिहासात जाणे लेखमर्यादेत शक्य नाही पण उदाहरणार्थ - दक्षिण फ्रान्समधील नाईस नावाचा प्रांत (हा पूर्वापार स्वतंत्र प्रांत फ्रान्सने बळकावला), ब्रिटनच्या अखात्यारीतील आयल ऑफ मॅन (यांची भाषा, संस्कृती इंग्लिश नाही), जर्मनीतील एक बेट, हंगेरीतील डोंगराळ प्रदेश, ट्रान्सनिस्त्रिया हा युक्रेन देशाजवळचा प्रदेश, वगैरे युरोपमधील; आशियातील वर म्हटलेला 'कुर्दिस्तान', तिबेट - जो चीन आपला प्रदेश मानतो पण त्यांची बौद्ध संस्कृती निराळी, भाषा निराळी, वंश मुख्य प्रवाहाचा हान वंश नाही ; वीघर हा मुस्लीम-बहुल प्रदेश - तोही चीनमधील (त्याचा आढावा ‘आंदोलन’मध्ये घेतलेला आहे) - त्यांच्या श्रद्धा मुस्लिम - हान हा मुख्य प्रवाह आतापर्यंत त्यांना कमी लेखत असे, आता मुस्लीम असल्याने संशयाने पाहतो. भारत व पाकिस्तानातील पूर्वीचा पंजाब, श्रीलंकेतील तमिळ इलम, जपानमधील कोरिअन लोक- त्यांची भाषा जपानी नाही, उत्तर किंवा दक्षिण कोरिअनही नाही; वगैरे. आफ्रिकेतील दारफ्युर हा संघर्षग्रस्त प्रदेश, सोमालियातील विभक्त होऊ पाहणारा सोमालीलंड प्रदेश वगैरे. हे इतर प्रदेश म्हणा, ‘देश’ म्हणा, CONIFA च्या स्पर्धांमध्ये भाग घेतात. आपली कोठेतरी दखल घेतली जात आहे, आपल्याला बरोबरीचे मानणारे लोक इतर वंशाचे, संस्कृतीचे असले तरी, आपला त्यांच्याशी समान धागा आहे ही भावना या उपक्रमाने जोपासली जाते आणि ती निरोगी आहे.

CONIFA सारखाच दुसरा एक प्रयोग २००१ ला सुरु झाला. तोही फुटबॉलमार्फत लोकांचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न करतो. मात्र ते लोक वरच्याप्रमाणे देश नसलेले नाहीत. तर अधिकृत देशांतील बेघर लोक आहेत. एका अंदाजानुसार जगात आज सुमारे १० कोटी लोक बेघर आहेत. त्यातील साधारण १ लाख लोकांपर्यंत हा उपक्रम दरवर्षी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पोचतो असा आयोजकांचा दावा आहे. गेल्या दहा वर्षात ७० देशातील ४२० शहरात सुमारे दहा लाख लोकांचा सहभाग झाला आहे. ही आकडेवारीही कौतुकास्पद आहे.

देशाच्या कसोटीनुसार बेघर कोण हे ठरते, मग त्यातून खेळाडूंची निवड होते. नियमितपणे त्यांना वर्षभर या खेळात सामावणे, त्याचे शिक्षण देणे, तशी शिस्त लावणे चालू असते. मग जागतिक स्तरावर स्पर्धा भरवली जाते. यावर्षीच्या स्पर्धा ब्रिटनमधील ग्लासगो शहरात जुलैमध्ये आहेत.

असुरक्षितता, निराशा, हतबलता या नकारात्मक भावनांबरोबर बेघरांना संवादाचा अभाव, कौशल्ये अविकसित राहणे यालाही सामोरे जावे लागते. काही प्रमाणात तरी खेळातील सहभागाने ही नकारात्मकता कमी होते. इतरांत मिसळणे, स्पर्धेत भाग घेणे यामुळे आपण आपल्याहून मोठ्या कोणत्यातरी कार्यक्रमात सहभागी आहोत ही भावना येते व आत्मविश्वास वाढतो.

हे अभिनव उपक्रम व्यवस्थेतून तात्पुरता दिलासा देऊन ती अधिक बळकट करतात का ती आज तरी उपेक्षितांसाठी काही प्रमाणात सह्य करतात हे विचारार्ह आहे.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*